जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८८१ दिनांक - १७/१२/२०२३**

चंदननगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## शुभम महेंद्र भोसले (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०७ साथीदार यांचेवर मकोका कारवाई

दि.१०/१०/२०२३ रोजी रात्रौ ०१/२५ वा.चे सुमा कॅफे बुध्दाज चायनिज हॉटेलचे समोर,जुना मुंढवा रोडवर वडगावशेरी पुणे येथे यातील फिर्यादी हे उभे असताना आरोपी नामे **शुभम महेंद्र भोसले व त्याचे** सोबत ४ ते ६ अनोळखी इसम त्यांचेकडील दुचाकी गाडीवर येवुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन फिर्यादी यांना मारणेसाठी अंगावर धावुन आले.त्यावेळी फिर्यादी हे जीव वाचवण्यासाठी आंबेडकर वसाहतीचे दिशेने धावले असता त्या सर्वांनी मागे येवुन वसाहतीच्या बाहेर लावलेल्या दुचाकी तसेच तिनचाकी चारचाकी गाड्यांच्या काचा फोडुन नुकसान करुन जोरजोरात आरडाओरडा केला असता वसाहतीमधील लोक जमा झाले असता आरोपींनी त्यांचेजवळील धारधार शस्त्रे व लाकडी दांडके हवेत फिरवुन दहशत निर्माण केल्याने सदर ठिकाणी जमा झालेले लोक घाबरुन पळुन गेले म्हणुन **चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.४७०/२०२३ भा.दं.वि. कलम १४३,१४४,१४७,१४८,१४९, ५०४,५०६,४२७, क्रि.लॉ.अॅ.कलम ३,७ आर्म अॅक्ट ४(२५),म.पो.अॅक्ट कलम ३७(१)(३) सह १३५** प्रमाणे गुन्हा करणेत आला आहे.

दाखल गुन्ह्याचा तपासा दरम्यान आरोपी नामे १)**शुभम महेंद्र भोसले,वय-२७ वर्षे,रा.सिद्धार्थ नगर,बंडगार्डन,पुणे (टोळी प्रमुख) २)संकेत सुरेश कांबळे,वय २७ वर्षे,रा.गणेशनगर,येरवडा,पुणे ३) आकाश आनंद बेत्ती,वय २० वर्षे,रा.अखिल बिडी कामगार वसाहत,मित्र मंडळाचे मागे,चंदननगर,पुणे ४) योगेश संजय शिरसाठ,वय २१ वर्षे,रा.नवले चाळ,प्रतिक मंगल कार्यालयासमोर,वडगावशेरी,पुणे यांना दाखल गुन्हा अटक करण्यात आली आहे. ५)निहाल उर्फ मोन्या संजय भालेराव,रा.गणेशनगर, वडगावशेरी,पुणे हा पाहिजे आरोपी आहे. तसेच दोन महिला व एक इसम यांनी दाखल गुन्हयात अटक पुर्व जामीन घेतला आहे.**

नमुद आरोपी शुभम महेंद्र भोसले (टोळी प्रमुख) व त्याचे इतर साथीदार यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असुन,त्याने बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्याचे उद्देशाने एकट्याने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करुन किंवा हिंसाचार करण्याची धमकी देऊन किंवा धाकदपटशा दाखवुन किंवा जुलुम जबरदस्ती करुन किंवा अन्य अवैध मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालु ठेऊन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे संघटीत गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन सदर टोळीने मागील १० वर्षात खुन करणे,खुनाचा प्रयत्न करणे,दरोडा घालणे,मालमत्तेचे नुकसान करणे,दुखापत,हमला किंवा गैरनिरोध करण्याची पुर्वतयारी करुन नंतर गृह अतिक्रमण करणे,बेकायदेशीर जमाव जमविणे,बेकायदेशीररित्या हत्यार बाळगुन दहशत निर्माण करणे इत्यादी प्रकारचे गुन्हे केल्याचे निदर्शनास आले आहे.सदरचे गुन्हे हे,टोळीचे वर्चस्वासाठी व दहशत कायम ठेवण्यासाठी तसेच नागरीकांच्या मनात भिती निर्माण करण्यासाठी सातत्याने चालु ठेवल्याचे निष्पन्न झाले आहे.त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गंभिर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

यातील नमुद आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी प्रस्तुत गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने प्रस्तुत गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करणेकामी चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.राजेंद्र लांडगे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ४,पुणे शहर,श्री.शशिकांत बोराटे यांच्या मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा,यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन चंदननगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं.४७०/२०२३ भा.दं.वि.कलम १४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,५०६,४२७,क्रि.लॉ.अ‍ॅ.कलम ३,७ आर्म अ‍ॅक्ट ४(२५),म.पो.अ‍ॅक्ट कलम ३७(१)(३)१३५ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे,श्री.राजेंद्र लांडगे, पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्रीमती.मनिषा पाटील, सहा.पोलीस निरीक्षक,भगवान कांबळे, पोलीस उपनिरीक्षक,संजय गायकवाड, पोलीस अंमलदार,राजेश नवले, रामचंद्र गुरव, बबनराव केदार, नाना पतुरे, गणेश आव्हाळे, अनुप सांगळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईन लक्ष देवुन,शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही १०२ वी कारवाई आहे.**